गुरुवार, दि. ११ सप्टेंबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २६ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com


# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## स्वातंत्र्य धोक्यात; जनसुरक्षा विधेयकाला जालन्यात विविध संघटनांचा तीव्र विरोध

### जनसुरक्षा विधेयक रद्द करण्याची मागणी; जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन







**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयक २०२४ व २०२५ च्या माध्यमातून लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांवर गदा आणली जात असून, या विधेयकाला जालना जिल्ह्यातून तीव्र विरोधाचा सूर उठला आहे. महाराष्ट्र जन सुरक्षा विधेयक विरोधी कृती समिती, जालना तर्फे जिल्हाधिकारी कार्यालयात याबाबत निवेदन देण्यात आले.

या निवेदनाद्वारे समितीने स्पष्ट केले की, या विधेयकामुळे लोकशाहीचा गळा घोटला जाईल. भाषण, लेखन, निदर्शने, आंदोलन, सत्याग्रह यासारख्या लोकशाही मार्गाने आपला विरोध नोंदविणाऱ्या जनतेला गुन्हेगार ठरवण्याचा धोकादायक प्रयत्न सरकार करत आहे. यामुळे राज्यातील सर्वसामान्य जनतेच्या अधिकारांवर गदा येणार असून, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, आंदोलनाचा हक्क, संघटन स्वातंत्र्य धोक्यात येईल.

समितीने निवेदनात या विधेयकातील अनेक कलमांचा उल्लेख करत म्हटले आहे की, सार्वजनिक सुव्यवस्थेला धोका मानला जाईल अशा कोणत्याही आंदोलनास गुन्हा ठरवला जाईल., न्यायालयीन वा विधिस्थापित संस्थांबाबत अविश्वास व्यक्त करणे, किंवा त्यांच्यावर टीका करणे गुन्हा मानला जाईल., सरकारविरोधी विचारसरणी मांडल्यास, ती देशविरोधी ठरवून कारवाई होऊ शकते., शांततेत आंदोलन करणाऱ्या नागरिकांवर अन्याय्य कृती केल्याचा ठपका ठेवला जाईल.

या विधेयकामुळे भीती व दहशतीचे वातावरण तयार होईल. सरकारला जनतेच्या मूलभूत अधिकारांवर गदा आणण्याचे हत्यार मिळेल. भविष्यात सामान्य आंदोलन करणारा शेतकरी, विद्यार्थी, कामगार, शिक्षक, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते यांना गुन्हेगार ठरवले जाऊ शकते, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

जालना जिल्ह्यातील विविध राजकीय, सामाजिक व कामगार संघटनांनी या विधेयकाला विरोध दर्शवला असून, संपूर्ण महाराष्ट्रात याविरोधात आंदोलन उभारले जाईल, असा इशारा समितीने दिला आहे. १० सप्टेंबर २०२५ पासून राज्यभर निवेदन, निदर्शने, सत्याग्रह, धरणे यांच्या माध्यमातून लोकशाही वाचवण्यासाठी लढा उभारला जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

या विरोधी कृती समितीत भाकप, माकप, राष्ट्रवादी शरद पवार गट, काँग्रेस, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट, माले, सकप, समाजवादी पक्ष, ऑल इंडिया फॉर ब्लॉक भारत जोडो अभियान, श्रमिका मुक्ती दल, विविध डाव्या व लोशाहीवादी पक्ष - संघटना यांसह विविध सामाजिक संघटनांचा समावेश आहे.

लोकशाहीवर गदा आणणारे हे जनसुरक्षा विधेयक आम्हाला मान्य नाही. सरकारने हा विधेयक मागे घ्यावा, अन्यथा राज्यव्यापी आंदोलन छेडले जाईल, असा इशारा निवेदनाच्या अखेरीस देण्यात आला आहे.

## परतूरात पत्रकार आणि पत्नीवर वाळू माफियांचा हल्ला

### वाळू माफियांच्या वाढत्या मुजोरीचा गंभीर प्रश्न

**परतूर । प्रतिनिधी -** परतूरच्या आनंदवाडी परिसरात स्थानिक पत्रकार पांडुरंग शेजुळ यांच्या व पत्नी सुरेखा शेजुळ यांच्यावर वाळू माफियांच्या संतप्त कृत्याचे गंभीर प्रकरण समोर आले आहे. वाळूच्या वाहतुकीबाबत बातमी छापल्याचा आरोप करीत माफियांनी दोघांवर आक्रमण केले, जातीवाचक शब्दप्रयोग केला आणि जीवमारण्याची धमकी दिली या घटनेनंतर परतूर पोलिस ठाण्यात ट्रॉसिटीचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

या घटनेने स्थानिक पातळीवर वाळू माफियांची वाढलेली मुजोरी आणि त्यांना मोकळे रान मिळत असल्याचा गंभीर प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. हा केवळ एका पत्रकारावरील हल्ला नसून, बेकायदेशीर धंद्यांविरुद्ध आवाज उठवणाऱ्या लोकशाहीच्या चौथ्या स्तंभावर झालेला हल्ला आहे.

अधिक माहिती अशी की, आनंदवाडी येथील पत्रकार पांडुरंग तुळशीराम शेजुळ यांनी पोलिसांत दिलेल्या तक्रारीनुसार, प्रशांत कदम आणि पवार (पूर्ण नाव माहिती नाही) त्याचा एक साथीदार यांनी त्यांच्यावर आणि त्यांच्या पत्नीवर हल्ला केला. आरोपींनी पत्रकारांच्या वाळूच्या ट्रॅक्टरबद्दल बातम्या देण्याबद्दल आक्षेप घेतला आणि त्यांना जातीवाचक शिवीगाळही केली.

पहिल्यांदा, पत्रकार पांडुरंग शेजुळ हे वडापाव खाण्यासाठी थांबले असताना, आरोपींनी त्यांच्याशी वाद घालण्यास सुरुवात केली. त्यावेळी, आरोपींनी मी मागील एक वर्षापासून रेतीचा धंदा करतोय, त्याने माझं काही वाकडं केलं नाही, असे म्हणून जातीवाचक शिवीगाळ केली. यानंतर पवार हे त्यांच्यावर हल्ला करण्यासाठी लोखंडी रॉड घेऊन ते धावून आले, ज्यामुळे शेजुळ पान २ वर




युवा आदर्श

### छडी ...

नावाखाली शिस्तीच्या
धावणारे पायचं ओढी
स्वातंत्र्य माझे हिरवले
पालकांबद्दल ती अढी
बंदिस्त करतो पाखरा
लावे उगा कुलुप कडी
भिती दावी खड्ड्यांचे
मारत असता लांब उडी
काय चाले बालमनांत
कधीतर ओळख नाडी
सूर्य उजळे उदयोन्मुख
का समजे तया अनाडी
मृदू मनावर वळओढी
शिस्तीची अदृश्य छडी
दडपून टाकतो अवेळी
वृत्ती खेळकर गुलझडी
तारूण्यपिटीका स्पर्शे
फुटायं लागलीयं दाढी
अनाकलनीय हेचं वय
अद्भुत वळणावर गाडी
तिरस्कारे इतरां समोर
मुले आज कालची मुडी
गोंडस शब्द सुसंस्कृती
लादतो परंपरा न् रूढी

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## आनंदवाडीतील रोहित्रामुळे नागरिकांसह जनावरांचा जीव धोक्यात

### महावितरणच्या दुर्लक्षामुळे मोठा अपघात होण्याची शक्यता

**जालना । प्रतिनिधी -** श्रीराम मंदिर, आनंदवाडी परिसरात उघड्यावर ठेवलेले वीज रोहित्र नागरिकांच्या सुरक्षेला मोठा धोका निर्माण करत आहे. या रोहित्रामुळे अपघाताची शक्यता कायम असून परिसरातील जनावरेही या डीपीजवळ वारंवार जात असल्याने विजेचा धक्का लागून गंभीर दुर्घटना घडू शकते. तरीही महावितरणच्या अधिकाऱ्यांनी याकडे केलेले दुर्लक्ष संतापाचा विषय ठरला आहे.

श्रीराम मंदिराच्या अगदी जवळ उघड्यावर रोहित्र बसवण्यात आले आहे. परिसरात ये-जा करणारे नागरिक, लहान मुले तसेच जनावरे याचा फटका बसू शकतात. परिसरातील नागरिकांनी अनेकदा महावितरणकडे तक्रारी करून रोहित्र सुरक्षित करण्याची मागणी केली. मात्र त्याकडे सोयीस्कर दुर्लक्ष होत असल्याने प्रचंड रोष व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या काही पान २ वर



**महावितरण; बिल भारी, पण जीवावरी धोका जारी!**

**उघड्या रोहित्राचे छायाचित्र घेत असतांना निरागस जनावर ही छायाचित्र घेणाऱ्याकडे पाहतांना दिसून येत आहे. 'बिल वसुलीत नंबर वन असलेली महावितरण, सुरक्षिततेत मात्र शून्यावर' 'दुध देणाऱ्या जनावरांचा जीव इतका स्वस्त आहे का?' हा प्रश्नच हे जनावर छायाचित्रातून विचारत असेल का?**

## जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते क्षय रुग्णांना पोषण आहार किटचे वाटप

**जालना । प्रतिनिधी -** जालना कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पुढाकाराने जालना जिल्ह्यातील उपचारावर असणाऱ्या १०० क्षय रुग्णांना कोरडा पोषण आहार (तांदुळ ०२ किलो, गहू- ०२ किलो, साखर-१ किलो, हरभरा दाळ-१ किलो) समाविष्ट असणाऱ्या किटचे वाटप आज दि. ११ सप्टेंबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जयश्री भुसारे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.जी.एम. कुडलीकर, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गजानन मस्के, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संजय खांडेभराड, जिल्हा सामान्य रुग्णालयाचे डॉ. कुलकर्णी, वैद्यकीय अधिकारी डॉ. रमेश काकड व डॉ.पी.व्ही. नागदरवाड यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते.

भारत सरकारने वर्ष २०२५ पर्यंत क्षयरोग मुक्त भारत करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्याअनुषंगाने प्रधानमंत्री टीबीमुक्त भारत अभियानांतर्गत कम्युनिटी सपोर्ट टू टीबी पेशंट हा उपक्रम संपुर्ण भारत देशामध्ये राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत उपचाराखाली असलेल्या व संमती दिलेल्या सर्व क्षय रुग्णांना सामाजिक संस्था, औद्योगिक संस्था व समाजातील दानशुर व्यक्ती यांनी निक्षय मित्र म्हणुन नोंद करुन त्यांच्यामार्फत क्षय रुग्णांना अतिरिक्त पोपण आहार किट देण्याकरीता केंद्र शासनामार्फत प्रधानमंत्री टीबीमुक्त अभियान राबविण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात प्रातिनिधीक स्वरुपात १०० उपचारावरील क्षयरुग्णांना जिल्हाधिकारी कार्यालय जालना येथे पोषण आहार किटचे वाटप करण्यात आले. यावेळी डॉ. जी. एम. कुंडलीकर जिल्हा क्षयरोग पान २ वर

## निवड श्रेणी व वरिष्ठ वेतन श्रेणी प्रशिक्षण प्रमाणपत्र तात्काळ वितरित करा

### आमदार बबनराव लोणीकर यांची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** एकाच वेतन श्रेणीमध्ये सलग १२ वर्ष सेवा पूर्ण केलेल्या व्यक्तीला वरिष्ठ वेतन श्रेणी तर २४ वर्षे सेवा पूर्ण केलेल्या व्यक्तीला निवड श्रेणी प्रशिक्षण दिले जाते. त्यानुसार दिनांक ३० एप्रिल २०२५ पर्यंत १२ व २४ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या राज्यातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील शिक्षकांचे निवड श्रेणी व वरिष्ठ वेतन श्रेणी प्रशिक्षण देण्यात आले. दि.२ जून २०२५ ते १२ जून २०२५ या दरम्यान ऑफलाइन पद्धतीने हे प्रशिक्षण पारही पडले. परंतु आतापर्यंत या प्रशिक्षणार्थींना त्यांचे प्रशिक्षण पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र मिळालेले नाही. हे प्रमाणपत्र तात्काळ वितरित करण्यात यावेत अशी मागणी माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

या प्रशिक्षणासाठी २ हजार रुपये नोंदणी शुल्क आकारण्यात आले होते. परंतु प्रशिक्षण पूर्ण करून ३ महिन्यांचा कालावधी पूर्ण झाला असताना देखील अद्याप पर्यंत या प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र मिळालेले नाहीत. त्यामुळे या सर्व शिक्षकांचे वेतन श्रेणी प्रस्ताव सादर करण्यात अडचणी निर्माण होत आहेत. SCERT कडे वारंवार विचारणा करून देखील अद्याप पर्यंत कुठलीही माहिती मिळालेली नाही, अशा आशयाची निवेदने जालना, परभणी, छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांमधून प्राप्त झाले असल्याचे देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी पत्रात म्हटले आहे.

सदर प्रशिक्षणादरम्यान संबंधित प्रशिक्षणार्थींनी प्रशिक्षण पूर्ण करून स्वाध्याय व कृती संशोधनाचे गुण जुलै अखेरपर्यंत ऑनलाईन पद्धतीने SCERT कडे पाठवणे अपेक्षित आहे त्यानुसार ते सर्व गुण पाठविण्यात आलेले आहेत. असे असताना या सर्व प्रशिक्षणार्थी शिक्षकांना अद्याप पर्यंत प्रशिक्षण पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र वितरित करण्यात आलेली नाहीत.



त्यामुळे या सर्व शिक्षक बांधवांना वेतन श्रेणी बदल करण्यासंदर्भातील प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यासाठी मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत आहे. असेही आमदार बबनराव लोणीकर यांनी पत्रात म्हटले आहे.

प्रशिक्षण पान २ वर

## संपादकीय

# पत्रकारितेवरचा हल्ला की लोकशाहीवरचा?

परतूर तालुक्यात घडलेली घटना धक्कादायक आणि लोकशाहीस घातक ठरावी अशी आहे. एका स्थानिक पत्रकारावर वाळू माफियांनी त्याच्या पत्नीसमवेत केलेला हल्ला, जातीवाचक शिवीगाळ आणि जीवघेण्या धमक्या या केवळ एका व्यक्तीवरील गुन्हा नाहीत; तर हे पत्रकारितेच्या स्वातंत्र्यावर थेट हल्ला आहे. पत्रकार पांडुरंग शेजुळ यांनी आपल्या व्यवसायधर्माला न्याय देत स्थानिक वाळू वाहतुकीवरील बातम्या प्रसिद्ध केल्या. यातून माफियांचे हितसंबंध धोक्यात आले असतील. पण बातमी ही गुन्हा नाही; उलट समाजापुढे सत्य ठेवणे हे पत्रकाराचे कर्तव्य आहे. त्यावरून पत्रकार व त्याच्या पत्नीवर हिंसक हल्ला होणे हे प्रशासनाच्या दुर्लक्षाचे द्योतक आहे. महाराष्ट्रात अवैध वाळू उत्खनन ही मोठी समस्या आहे. यातून लाखो रुपयांचा काळा पैसा फिरतो आणि अनेकदा राजकीय छत्रछायेत हे व्यवहार चालतात. या माफियांच्या विरोधात आवाज उठवणाऱ्या पत्रकारांवर, कार्यकर्त्यांवर किंवा साध्या नागरिकांवर दबाव आणणे, धमक्या देणे आणि हल्ले करणे हे नेहमीचे झाले आहे. परंतु यापुढे अशा घटनांकडे काळजीपूर्वक पाहणे नव्हे, तर कठोर कारवाई करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. या घटनेत जातीवाचक अपशब्दांचा वापर झाल्याचेही नमूद आहे. म्हणजे केवळ गुन्हेगारी नाही, तर सामाजिक विषमता आणि दहशतही यातून उघड झाली आहे. अ‍ॅट्रॉसिटी कायद्यानुसार गुन्हा दाखल झाला असला, तरी खरे प्रश्न म्हणजे या कायद्यांची अंमलबजावणी किती कठोरतेने केली जाणार? आरोपींना लवकरात लवकर अटक होईल का? पत्रकार हे समाजाचे डोळे आणि कान आहेत. त्यांच्यावर हल्ला म्हणजे समाजाला अंध आणि बहिऱ्या करण्याचा प्रयत्न आहे. त्यामुळे ही घटना केवळ कायद्याच्या चौकटीत बसणारा गुन्हा म्हणून न पाहता, ती लोकशाहीवरील धोक्याची घंटा म्हणून पाहावी लागेल. उपविभागीय अधिकारी तपास करत आहेत ही बाब स्वागतार्ह आहे; परंतु तपासाचा गतीमान व पारदर्शक निकाल न लागल्यास समाजातील विश्वास ढासळेल. पत्रकारांच्या सुरक्षिततेची हमी सरकारने द्यावी, अन्यथा स्वातंत्र्यप्राप्त पत्रकारितेचे स्वप्न फोल ठरेल. आरोपींवर कठोर कारवाई करावी, त्यांना कायद्यानुसार शिक्षा व्हावी. अवैध वाळू उत्खननावर नियंत्रण आणावे. स्थानिक पत्रकारांना प्रशासनाने संरक्षण द्यावे. पत्रकार हा कुणाचाही शत्रू नसतो; तो फक्त समाजाचा आरसा असतो. या आरशावर दगड फेकणाऱ्यांना वेळेत रोखले नाही, तर उद्या लोकशाहीचा चेहराही रक्ताळलेला दिसेल. पत्रकार वाचला तरच लोकशाही शाबूत राहील; अन्यथा माफियांचा मक्तेदारीशाहीत समाज कैद होईल.

# मित्रांनो, शुल्लक कारणावरुन नका करु भांडण तंटे

आजकालचा माणूस प्रचंड तापट व गरम दिमाखाचा झाला आहे. त्याला जराही राग व संताप अनावर होत नाही. अगदी लहान सहान गोष्टीवरून सुद्धा तो भांडण तंटे करायला उठत आहे. रागाच्या आणि संतापाच्या भरात तो नको ते पाऊल उचलून कोणताच मागचा पुढचा विचार न करता, नको ते अमानुष दुष्कृत्य करून किंवा हाणामारी करून शेवटी पोलीस स्टेशनची हवा खात आहे. आजकालच्या माणसांना विशेष करून नव्या तरुणाईला रागावर जराही कंट्रोल राहिले नाही. एखाद्याने बोललेली शुल्लक गोष्ट त्याला खूप मोठी वाटत आहे आणि तो ती गोष्ट मनाला चांगलीच लावून घेत आहे आणि यातूनच त्याच्या मनात प्रचंड राग व संताप उफाळून येत आहे. आणि तो या रागाच्या भरात नको ते कृत्य करून बसतो आणि गुन्हेगार म्हणून जेव्हा अंगावर पोलीस केस किंवा फौजदारी खटला दाखल होतो, आणि पोलीस स्टेशनमध्ये पोलीस जेव्हा त्यांना बेदम मारतात, तेव्हा त्याचा माज व त्याची भांडण करण्याची नशा आपोआप उतरून जाते. आणि पोलीस बांधव येऊन त्यांना उचलून गाडीत टाकतात आणि तुरुंगात नेऊन फेकतात. आणि नंतर कोर्टाच्या वाऱ्या करताना त्यांच्या नाकी नऊ येते. आणि वकिलांना भरमसाठ पैसा देऊन माणूस पार व्याकुळ होऊन जातो. ज्याला कायदा व जेलची हवा माहीत नाही तोच माणूस भांडण तंटे करण्याच्या भानगडीत पडतो. थोडक्यात सांगायचे म्हणजे अविचारी व बालिश बुद्धीच्या तरुणांना कोणत्याच गोष्टीची अक्कल नसते. अगदी लहान सहान गोष्टीवरून सुद्धा ते भांडण तंटे करतात. एखाद्या गल्लीचा मोठा भाई बनण्याच्या नादात ते वाद विवाद करून स्वतःला कायद्याच्या कचाट्यात अडकवून घेतात. स्वतःच्या हाताने स्वतःच्या पायावर धोंडा मारून घेतात. आणि नंतर काही काळ कोर्टाच्या वाऱ्या करत राहतात. कारण हल्लीच्या माणसांमध्ये विचार करण्याची शक्ती, संयम व धीर यांचा जराही ताळमेळ राहिलेला नाही. आजकालचा माणूस अविचारी, बालिश आणि असंयमी बनला आहे. म्हणजे आजकालच्या माणसाला एखाद्याने नकळत सहजपणे बोललेली उपहासात्मक, अगदी शुल्लक गोष्ट सुद्धा पचवता येत नाही. ती उपहासात्मक शुल्लक गोष्ट सुद्धा त्याला जिव्हारी लागत आहे. एखाद्याने मित्रत्वाच्या किंवा दोस्तीच्या नात्याने मनमोकळेपणाने केलेली टिंगल किंवा चेष्टा आमच्या बांधवांना कदापि सहन होत नाही. लगेच त्याचा पारा चढतो आणि तो वाद करण्यासाठी सज्ज होतो. म्हणजे आजकालची युवा पिढी अविचारी, दिशाहीन व तापट स्वभावाची झाल्यामुळे त्यांचा मानसिक ताण वाढत आहे. आणि म्हणूनच असे भांडण तंटे घडत आहेत. याला घरातील आई-वडील व शाळेतील शिक्षक जबाबदार धरले तर ते वावगे ठरणार नाही. कारण आजकालच्या मुलांना आईवडील अतिलाडात वाढवत आहेत. त्यांना जराही आपल्या धाकात व दडपणात ठेवत नाहीत. त्यांच्या मनावर योग्य संस्कार रुजवणे हे आजकालच्या आई-वडिलांना जमत नाही. मुलांच्या मनावर संस्काराची उधळण करणारे आजी-आजोबा आता नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. घरातील ज्येष्ठांना वेगळे सोडून अलिप्त राहिल्यामुळे आजकालच्या मुलांवर संस्काराची योग्य पेरणी होणे दुरापास्त झाले आहे. आजकालच्या तरुण-तरुणींना संस्कार म्हणजे काय? मुलांवर संस्कार कसे रुजवायचे? आपली मुले सुसंस्कारी व चारित्र्यवान कसे घडवावेत? याची जराही अक्कल व भान राहिले नाही. कारण आजकाल टीव्ही व मोबाईल प्रत्येकाच्या हातात आहे, प्रत्येक जण मोबाईलच्या आहारी गेल्यामुळे मोबाईल मध्ये गुरफटून गेलेली युवा पिढी मोबाईल मध्ये नको ते ओंगळवाणे व घाणेरडे व्हिडिओ पाहत असते, बनावट व डुप्लिकेट मारामारीचे व फायटिंग चे सीन पाहत असते. याचा परिणाम आजकालच्या मुलांवर होत आहे. मुले सुद्धा हाच आदर्श घेऊन पुढील वाटचाल करतात. याचा दुष्परिणाम विद्यार्थ्यांच्या मनावर खोलवर रुजत असतो. मोबाईल व टीव्हीच्या माध्यमातून विद्यार्थी खरे तर बिघडत आहेत. याचा जबरदस्त प्रभाव विद्यार्थ्यांच्या मनावर होत असल्यामुळे विद्यार्थी सुद्धा तेच अनुकरण करून शुल्लक गोष्टीवरून वाद-विवाद, संशय, अश्लीलता, भांडण तंटे करत असतात. मुलगा आई-वडिलांच्या धाकात नसल्याने तो मनमानी व वाट्टेल तसे जीवन जगत असतो. आजकालचे पालक आपल्या मुलांना मनमानी जीवन जगू तर देतात पण त्यांना जराही रागावत नाहीत किंवा त्यांच्या मनात आपल्याबद्दल धाक व दरारा निर्माण करत नाहीत. त्यांना लाडाकोडात वाढवून त्यांच्या मनाप्रमाणे जीवन जगू देतात. लाडाकोडात वाढलेली मुले तापट, टवाळखोर व गरम दिमाखाची निपजतात. ते घरातील आई-वडिलांना सुद्धा जुमानत नाहीत किंवा शाळेतील शिक्षकांना सुद्धा घाबरत नाहीत. गावातील वडीलधाऱ्या माणसांचा, आपल्यापेक्षा वयाने मोठे असणाऱ्या माणसांचा आदर करायचा असतो, हे त्यांना माहीत नसते. याला कारणीभूत दुसरे तिसरे कोणी नसून त्यांचे आई वडील व शाळेतील शिक्षक असतात. त्यांनी आपल्या मुलांचा अतिलाड केल्यामुळे मुले तापट, तिरसट व गरम स्वभावाची बनतात. त्यांना वाटत असते की, माझे आईवडील मला काहीच म्हणत नाहीत, माझ्यावर रागावत नाहीत किंवा माझी टिंगल टवाळी करत नाहीत आणि माझी थट्टा व मस्करी करणारा तू कोण आहेस? मित्राने माझ्या प्रेयसीला प्रपोज मारला म्हणून आपल्याच मित्राला जीवानिशी मारले जात आहे. मित्रत्वात एखाद्याने सहजपणे शिवीगाळ केली तर मित्रासोबत हाणामारी केली जात आहे. त्याने माझ्याकडे बघून का हसले? या गोष्टीवरून सुद्धा वाद विवाद केला जात आहे. एखाद्याने गाडीला ओव्हरटेक केले म्हणून त्याच्यासोबत जबरदस्त भांडण केले जात आहे. जयंती मिरवणुकीत नाचतेवेळी एखाद्याचा नकळत धक्का लागला तर त्याच्यासोबत चांगलेच भांडण केले जात आहे. शिक्षकाने विद्यार्थ्याला मारले म्हणून मुलाचे पालक शाळेत येऊन त्या शिक्षकाला शिव्या घालतात. काही शाळेत तर विद्यार्थ्याच्या बापाने माझ्या मुलाला का मारले म्हणून शिक्षकाला मारल्याचे प्रकार वर्तमानपत्रात वाचले आहेत. माझ्या शेतात तुझे जनावरे कसे काय आले? म्हणून, शेतकऱ्यांमध्ये सुद्धा शुल्लक गोष्टींवरून वादविवाद निर्माण होत आहेत. महामंडळ बसणे प्रवास करताना आपण बघत आहोत की, काही महाभाग जागा धरण्यावरून भांडण तंटे करतात...यातून हाणामारी निर्माण होते आणि मग ती एसटी ड्रायव्हरला पोलीस स्टेशन मध्ये न्यावी लागते. काही घरांमध्ये भावभावकीत अगदी शुल्लक गोष्टीवरून मोठा वाद पेटला जातो. तुझ्या घरातील कचरा माझ्या घराकडे का सरकावून लावला? तुझ्या गटाराचे पाणी माझ्या घराकडे का काढून दिले? अशा अनेक शुल्लक कारणांवरून वाद विवाद पेटले जातात आणि हे वाद विवाद विकोपाला जाऊन घरातल्या घरातच हाणामारी होते. आणि माणुसकी मात्र कलंकित होते. पुन्हा हा खटला पोलीस स्टेशनला गेल्यावर पोलीस स्टेशन आणि कोर्ट म्हणजेच वकील यांचे प्रचंड आर्थिक शोषण करतात. एखादा व्यक्ती दुसऱ्याला बोलत असेल तर काहीजण ते स्वतःवर ओढून घेतात आणि त्या व्यक्तीसोबत भांडण तंटा करतात. अशा लहान सहान गोष्टीवरून भांडण तंटे करणारे लोक आपल्या अवतीभवतीच पाहायला मिळतात. शुल्लक गोष्टीवरून वादविवाद करणारे लोक आता संख्येने खूप वाढले आहेत. कारण आई-वडिलांच्या अति लाडामुळे घरी आईवडिलांना नको तसले घाण घाण शब्द वापरतात, त्यांचा जराही सन्मान व आदर करत नाहीत. आईवडील सुद्धा त्यांना काहीच बोलत नाहीत. कारण त्यांनीच त्यांचा लाड करून ठेवलेला असतो. अति लाडात वाढलेली मुले तापट व रागीट बनतात. लहान सहान कारणांवरून मित्रांसोबत, आई-वडिलांसोबत शेजाऱ्यांसोबत किंवा आपल्या कार्यक्षेत्रातील सहकारी कर्मचाऱ्यांबरोबर भांडण तंटे करतात.

आजकाल माणसांमध्ये स्वार्थ व हाव खूप वाढली आहे. स्वार्थापायी माणूस थोड्याशा जागेसाठी व गुंठाभर जमिनीसाठी म्हणजेच अगदी शुल्लक कारणावरून वाद विवाद करत आहेत, आणि हे वाद विवाद विकोपाला जाऊन सख्खे भाऊ पक्के वैरी बनून कोर्ट कचेरीच्या पायऱ्या तर चढतच आहेत परंतु एकमेकांसोबत हाणामारी करून जीवाशी खेळत आहेत. तो माझ्याकडे बघून हसला, त्याने माझ्या गाडीला साईट मारून गेला, तो माझ्याकडे बघून छाती फुगवून चालतोय आणि मला दुसऱ्यावर घालून टोमणे मारतोय तसेच माझ्याविषयी इतरांजवळ टीका टिप्पणी करतोय म्हणून बरेच महाभाग अशा लहान सहान बाबींवरून भांडण तंटे करण्यास सरसावत आहेत. माझे असे मत नाही की आपण भांडण तंटे करू नये. मित्रांनो भांडण तंटे हे केलेच पाहिजेत परंतु जर खरंच आपल्यावर अन्याय अत्याचार होत असेल आणि आपल्याला कोणी नाहक त्रास देत असेल तर त्याच्या विरोधात बंड करून उठलेच पाहिजे. त्याला त्याची जागा आणि लायकी दाखवलीच पाहिजे. अन्यायावर प्रहार करायला संविधानाचे शिल्पकार तथा राष्ट्रनिर्माचे डॉ. बाबासाहेबांनी आपल्याला सांगितलेच आहे, की अन्याय करणाऱ्या पेक्षा अन्याय सहन करणारा जास्त गुन्हेगार असतो. म्हणून अशा अन्यायी, दुष्ट व मानवी रूपातील दानवांना व सैतानांना खरी जागा दाखवलीच पाहिजे. एखादा व्यक्ती जबरदस्तीने आपली जागा बळकावत असेल, आपल्या आया बहिणींना नाहक त्रास देत असेल, आपल्या मालकी हक्कावर आपला ताबा मिळवत असेल तर अशा लोकांना कायद्याचा बडगा दाखवून त्यांना योग्य शासन केलेच पाहिजे. म्हणजे जाणीवपूर्वक बेकायदेशीर जर कोणी आपल्याला नाहक त्रास व शिवीगाळ करत असेल किंवा मारण्यासाठी पुढे धजावत असेल तर अशा लोकांना आपण कायद्याचा बडगा दाखवून सबक शिकवलाच पाहिजे... तरच आपल्यात खरा पुरुषार्थ आहे असे म्हणता येईल. पण शुल्लक गोष्टीला मनावर घेऊन शुल्लक गोष्टीचे रूपांतर मोठ्या भांडणात करून उगाच समाजबांधवांसोबत, भावकी सोबत व मित्रांसोबत शत्रुत्व निर्माण करू नका...सर्वांशी प्रेमाने, मायने व आपुलकीने राहा.मानवी जन्म हा पुन्हा पुन्हा मिळणार नाही... मिळालाय जन्म माणसाचा म्हणून त्याचा भरभरून आनंद घ्या. आणि शुल्लक गोष्टीवरून वादविवाद करत बसू नका.. कारण तुम्हाला आपल्या महापुरुषांची आन आहे.

**- बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

# नेपाळमधील भ्रष्ट मंत्र्यांचे हाल-बेहाल, देशातील भ्रष्ट व गुन्हेगार मंत्र्यांचे काय? त्यांच्यासाठी फाशीच्या शिक्षेचे प्रावधान होईल का?

अनेक वर्षांपासून नेपाळमधील संपूर्ण राजकीय पुढारी भ्रष्टाचाराने लिप्त होते.त्यामुळे तेथील अर्थव्यवस्था ढासळली व अनेक नवीन-नवीन समस्या निर्माण होत होत्या व नेपाळमध्ये भ्रष्टाचार उफाळल्याने तेथे बेरोजगारी, महागाई, शेतकऱ्यांच्या समस्या,शैक्षणिक समस्या अशा अनेक समस्यांचा सामना तेथील नागरिकांना व युवकांना करावा लागला.या घटनेला कंटाळून त्यांनी उग्र आंदोलनाचा पवित्रा घेतला व तेथील भ्रष्ट कारभार व घराणेशाही पाहुन युवा वर्गामध्ये आक्रोशची ज्वाला भडकली व आगबबुला होवून दिनांक ९ सप्टेंबर २०२५ ला संपूर्ण नेपाळ पेटुन उठला व तख्तापलट करून भ्रष्टाचाराला जळामुळासकट संपविण्याचा निर्णय घेतला. आता प्रश्न निर्माण होतो की भारतातील ९५ टक्के भ्रष्ट मंत्री, लोकप्रतिनिधी,जनप्रतिनिधी, स्वयंघोषित समाजसेवक, राजकीय पुढारी जे गुन्हेगारीमध्ये लिप्त आहेत,खुन, गुंडागर्दी,महिलांवरील अत्याचार अशा गंभीर गुन्ह्यांसारख्या आरोपांचा समावेश असणाऱ्यां अनेक गुन्हेगारांना सरकार कठोर शिक्षेच्या माध्यमातून फाशीच्या शिक्षेचे प्रावधान करेल काय? कारण देशातील भ्रष्ट राजकीय पुढारी देशाला पोखरून टाकले आहे.त्यामुळे कायद्याच्या माध्यमातून यांना फासावर चढविणार काय?असा प्रश्न नेपाळची परिस्थिती पाहून भारतात उपस्थित होतो.कारण आतंकवादी, खुनी,ड्रगमाफीया, बलात्कार या गुन्ह्यापेक्षा सर्वात मोठा गुन्हा म्हणजे भ्रष्टाचार कारण सर्वच गुन्हेगारीचा उगम भ्रष्टाचारामधुनच होतो.भ्रष्टाचारामुळे संपूर्ण देश पोखरल्या जातो व सर्वसामान्यांना अनेक गंभीर समस्यांचा सामना करावा लागतो.देशातील ९५ टक्के भ्रष्ट आजी-माजी राजकीय पुढारी आपली करोडोंची संपत्ती विदेशात गुंतवणूक ठेवतात व आपल्या परिवारातील मुलांचे शिक्षण विदेशात करतात.आता राजकीय पुढाऱ्यांनी नेपाळची घटना पहाता आपल्या मुलांना विदेशात न शिकता देशात शिकविण्याचा संकल्प केला पाहिजे अन्यथा नेपाळी राजकीय पुढाऱ्यांसारखे हाल देशातील भ्रष्ट राजकीय पुढाऱ्यांचे होवू शकतात यालाही नाकारता येत नाही.देशात जर ४७ टक्के अट्टल गुन्हेगार मंत्री ज्यात खून,अपहरण आणि महिलांविरोधातील गुन्हासारख्या गंभीर आरोपांचा समावेश असेल तर सर्वसामान्यांनी काय करावे! सर्वसामान्यांना कोण न्याय देणार!कारण आज राजकीय पुढारी गुन्हेगार असूनही मंत्रीपदावर किंवा लोकप्रतिनिधी पदावर मोठ्या ऐटीत विराजमान आहेत ही कीती लज्जास्पद आणि शरमेची बाब आहे.मंत्री आणि लोकप्रतिनिधी करोडो लोकांना ग्यान सांगतात आणि स्वतः अट्टल गुन्हेगारांमध्ये मोडतात व सर्वसामान्यांचे रक्त पितात ही तर लोकशाहीला काळीमा फासणारी बाब आहे.देशातील जवळपास ४७ टक्के (३०२) मंत्र्यांवर गुन्हेगारी प्रकरणे दाखल असुन, त्यामध्ये खुन, अपहरण,महिलांविरोधातील गुन्हे व अन्य गंभीर गुन्ह्यांसारखा गंभीर आरोपांचा समावेश आहे.असे निवडणूक हक्क संस्था असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स (एडीआर) च्या विश्लेषणातून समोर आले आहे.आज देशात कोणी गडगंज असेल तर तो फक्त राजकीय पुढारी. (एडीआय) च्या विश्लेषणा दरम्यान असेही लक्षात आले की देशातील मंत्र्यांच्या सरासरी मालमत्तेचा विचार केला तर आज प्रत्येकांजवळ कमीत कमी सरासरी मालमत्ता ३७ कोटी असल्याचे विश्लेषणा दरम्यान सांगण्यात आले.देशातील मंत्र्यांकडे २३९२९ कोटींची मालमत्ता असल्याचे सांगितले जाते ही बाब फक्त विश्लेषणातील आहे याहीपेक्षा अधिक मालमत्ता मंत्र्यांकडे व राजकीय पुढाऱ्यांकडे राहु शकते यालाही नाकारता येत नाही. म्हणजेच आज वाममार्गाने पैसा कमवीने व गुन्हेगारीचे जाळे निर्माण करने राजकीय पुढाऱ्यांचा व्यवसाय बनल्याचे दिसून येते. एडीआरने २७ राज्य विधानसभा,तीन केंद्रशासित प्रदेश आणि केंद्रीय मंत्रिमंडळातील मंत्री अशा ६४३ मंत्र्यांच्या प्रतिज्ञापत्रांचा अभ्यास केला.त्यापैकी ३०२ मंत्र्यांवर (४७ टक्के) गुन्हेगारीचे खटले दाखल आहेत.त्यात १७४ मंत्र्यावर गंभीर गुन्हे दाखल आहेत तरीही स्वतःला लोकप्रतिनिधी म्हणतात ही कसली लोकशाही म्हणावी!आपण केंद्र सरकारचा विचार केला तर केंद्रातील ७२ मंत्र्यांपैकी २९ (४० टक्के) मंत्र्यांवर गुन्हेगारी खटले दाखल आहेत.त्यात १९ मंत्र्यावर गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत ही कीती गंभीर बाब म्हणावी.देशातील राज्यांमध्ये आंध्रप्रदेश, कर्नाटक, तामिळनाडू, बिहार, ओडिशा, महाराष्ट्र, पंजाब, तेलंगणा, हिमाचल प्रदेश, दिल्ली, आणि पुदुचेरी या ११ राज्यातील विधानसभांमध्ये ६० टक्क्यांहून अधिक मंत्र्यांवर गुन्हेगारी खटले आहेत आणि ज्याठिकाणी गुन्हेगारी आली त्याठिकाणी भ्रष्टाचार १०० टक्के असतोच. त्यामुळे आता भारत भ्रष्टाचार मुक्त करण्याची गरज आहे. यासाठी भ्रष्ट राजकीय पुढाऱ्यांना कठोर शिक्षेच्या अंतर्गत फाशी शिक्षेचे प्रावधान आवश्यक आहे.कारण भ्रष्टाचारातुन गुन्हेगारीची उत्पत्ती होते.याला जर जळामुळासकट संपवायची असेल तर प्रथम कठोर कारवाई राजकीय पुढाऱ्यांवर होणे गरजेचे आहे.कारण देशातील भ्रष्ट व गुन्हेगारीने लिप्त असलेल्या राजकीय पुढाऱ्यांनी देशाला तब्बल १० वर्षे मागे ढकलले आहे.आजही देशातील अनेक आजी-माजी राजकीय पुढाऱ्यांची मुल-मुली विदेशात शिक्षण घेत आहेत व देशातील शिक्षण महागडे झाले आहे,महागाई वाढत आहे, शेतकऱ्यांच्या आत्महत्यां होत आहे, बेरोजगारी वाढत आहे यावरही सरकारने लगाम कसली पाहिजे.या संपूर्ण बाबींवर सरकारने गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.त्यामुळे या लेखाच्या माध्यमातून मान्यवरांना नम्र विनंती आहे की महामहीम राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, सर्वोच्च न्यायालय, प्रधानमंत्री, लोकसभा अध्यक्ष व सरकार यांनी गांभीर्याने लक्ष देऊन राजकीय वर्तुळातील गुन्हेगारी व भ्रष्टाचार कठोर शिक्षेच्या माध्यमातून संपवायला हवा.जय हिंद!

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९,नागपूर.**

## पान १ वरुन

### परतूरात पत्रकार ...

यांना पळून जावे लागले.

यानंतर, त्यांच्या पत्नी सुरेखा शेजुळ या आरोपीच्या आईला समजावून सांगण्यासाठी गेल्या असता, आरोपींनी पुन्हा एकदा पती-पत्नीला अडवले. यावेळी आरोपींनी थेट पत्नीवरच हल्ला केला. त्यांनी लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली, हात पिरगाळला, आणि तुम्ही जास्त माजले असाल तर तुम्हाला जाळून टाकू, अशी जीवे मारण्याची धमकी दिली.

या घटनेतील आरोपींनी एका वर्षापासून बेकायदेशीर वाळूचा धंदा सुरू असल्याचे स्वतःच मान्य केले आहे. याचा अर्थ, स्थानिक प्रशासनाकडे याची माहिती असूनही कोणतीही कारवाई झालेली नाही. त्यामुळे, त्यांना कायद्याचा कोणताही धाक वाटत नाही. पत्रकार हे समाजातील गैरप्रकारांविरुद्ध आवाज उठवणारे महत्त्वाचे घटक आहेत. अशा प्रकारे त्यांच्यावर हल्ले होत असतील, तर सत्य बाहेर काढण्याचे काम अधिक धोकादायक बनेल. या घटनेत पत्रकारांच्या पत्नीवरही हल्ला करण्यात आला. याचा अर्थ, वाळू माफियांची मुजोरी इतकी वाढली आहे की, ते कुटुंबातील महिलांनाही लक्ष्य करत आहेत.

आरोपींनी जातीवाचक शिवीगाळ केल्यामुळे त्यांच्यावर अ‍ॅट्रॉसिटी कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामुळे, वाळू माफियांनी केवळ गुंडगिरीच नाही, तर सामाजिक सलोख्यालाही धक्का पोहोचवण्याचा प्रयत्न केला आहे, हे स्पष्ट होते. परतूर पोलिस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे आणि उपविभागीय पोलिस अधिकारी आर. टी. रेंगे यांच्याकडे याचा तपास सोपवण्यात आला आहे. या तपासात आरोपींना तात्काळ अटक करून कठोर कारवाई करणे आणि यामागे असलेले संपूर्ण रॅकेट उघडकीस आणणे आवश्यक आहे.

या घटनेने प्रशासनाला वाळूच्या अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करण्याची गरज पुन्हा एकदा अधोरेखित केली आहे. अन्यथा, अशा घटना वारंवार घडत राहतील आणि लोकशाही मूल्यांवरचा विश्वास कमी होईल.

### आनंदवाडीतील रोहित्रामुळे. ..

महिन्यांपासून या रोहित्राच्या दुरुस्तीसाठी वारंवार मागण्या होत आहेत. काही वेळा तोंडी तक्रार, तर काही वेळा लिखित स्वरूपात देखील माहिती देण्यात आली. तरीसुद्धा संबंधित अधिकाऱ्यांनी कोणतीही दखल घेतली नाही. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर झाला आहे.

जर महावितरणने तातडीने उपाययोजना केली नाही, तर कुठल्याही क्षणी मोठा अपघात होऊ शकतो. त्याची संपूर्ण जबाबदारी महावितरणची राहील, असा इशारा परिसरातील नागरिकांनी दिला आहे.

सुरक्षेसाठी तातडीच्या मागण्या करण्यात आल्या असून यात रोहित्र सुरक्षित करण्यासाठी योग्य शेड बसवावे., डीपी परिसराला कंपाउंड करून जनावरांची व नागरिकांची वर्दळ रोखावी., परिसरात सुरक्षितता फलक (Warning Boards) लावावेत.

नागरिकांनी महावितरणला स्पष्ट संदेश दिला आहे की, उशिरा का होईना पण कारवाई व्हायलाच हवी, अन्यथा आम्हाला आंदोलनाचा मार्ग अवलंबावा लागेल.

### जिल्हाधिकारी आशिमा ...

अधिकारी म्हणाले की, प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियान जालना जिल्ह्यात उत्कृष्टपणे राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत कृषी उत्पन्न बाजार समिती जालना यांनी क्षयरुग्णांना कोरडा पोषण आहार किट वाटप केल्या याबद्दल जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी त्यांचे अभिनंदन केले. तसेच उपस्थित क्षयरुग्णांना संपूर्ण उपचार घेऊन पोष्टीक आहार घेऊन स्वतःची काळजी घेण्याबाबत आवाहन केले. तसेच कृषी उत्पन्न बाजार समिती जालना यांचा आदर्श घेऊन दानशुर व्यक्ती, औद्योगिक संस्था, सामाजिक संस्था यांनी निक्षय मित्र होऊन उपचारावरील सर्व क्षयरुग्णांना कोरडा पोषण आहार किट देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहनही करण्यात आले.

### निवड श्रेणी ...

पूर्ण करून देखील केवळ प्रशिक्षण पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र न मिळाल्यामुळे वेतनश्रेणी बदल अडकवून ठेवला जात असेल तर ही बाब अत्यंत गंभीर आहे. त्यामुळे सदरील सर्व प्रशिक्षणार्थींचे निवड श्रेणी व वरिष्ठ वेतन श्रेणी प्रशिक्षण पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र तात्काळ वितरित करून वरिष्ठ वेतनश्रेणी व निवड श्रेणी प्रस्ताव दाखल करण्यामधील अडचणी दूर कराव्यात असेही आमदार बबनराव लोणीकर यांनी पत्रात म्हटले आहे.

# महेश गिरी महाराज यांची स्वामी विवेकानंद पतसंस्थेला सदिच्छा भेट



**विशाल देशमुख**

**टेंभुर्णी** - येथील कमी वेळात टेंभुर्णीकरांच्या विश्वास जिंकलेल्या आणि आपल्या चांगल्या आणि प्रामाणिक व्यवहार मुळे टेंभुर्णी येथील लहान व्यापारी यांच्या व्यवसायात त्यांना पिग्मी मार्फत आर्थिक बळ देऊन मोठे केल्या मुळे अल्प कालावधीत प्रसिद्ध झालेल्या स्वामी विवेकानंद पतसंस्था ला भेट देऊन समाधान व्यक्त करून गौरी आश्रम मठाचे प्रमुख श्री महेश गिरी महाराज यांनी भेटून समाधान व्यक्त केले. या वेळी संस्थेचे अध्यक्ष श्री मुकुंद औटी यांनी बाबाजी यांचे शाल श्रीफळ देऊन स्वागत करून आशीर्वाद घेतला. या वेळी यांच्या सोबत गाडेकर मामा शिवाजी वर्गने मधुर काबरा यांच्या सह संस्थेचे संचालक अलकेश सोमाणी, शाम औटी, अविनाश राऊत, योगेश गाडेकर मोरे,यांच्या सह पतसंस्थेचे कर्मचारी ग्राहक उपस्थित होते.

# जालना बसस्थानकाजवळील राजमाता लॉजवर पोलिसांची धाड

## कुंटणखाना चालवणारे चौघे आरोपी जेरबंद, चार महिलांची सुटका

**जालना । प्रतिनिधी -** जालना बसस्थानक परिसरातील राजमाता लॉजवर स्थानिक गुन्हे शाखेने १० सप्टेंबर २०२५ रोजी धाड टाकून कुंटणखाना चालवणाऱ्या चौघा आरोपींना अटक केली आहे. या कारवाईत चार महिलांची सुटका करण्यात आली असून, आरोपींकडून २,२८० रुपये रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे.

पोलिस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांना लॉजमध्ये कुंटणखाना सुरु असल्याची गुप्त माहिती मिळाल्यानंतर त्यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक पंकज जाधव यांना कारवाईच्या सूचना दिल्या. त्यानुसार पोलिसांनी बुधवारी (१० सप्टेंबर) संध्याकाळी छापा टाकला.

यात १. कृष्णा दौलतराम हरदेकर (वय ३८, रा. संभाजीनगर, जालना) - लॉज मॅनेजर २. रवि रामदास जाधव (वय ३५, रा. मंगळबाजार, जालना) - मजूर ३. गजानन श्रीराम जाधव (वय ३२, रा. सेवली, ता.जि. जालना) - मजूर ४. दिपक विष्णु जोशी (वय २२, रा. सेवली, ता.जि. जालना) - मजूर या चौघांविरुद्ध कुंटणखाना चालवण्याबाबतचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

लॉजमधून चार महिलांची सुटका करण्यात आली असून त्यांना आवश्यक ती कायदेशीर व सामाजिक मदत पुरवली जात आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.



स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सपोनि योगेश उबाळे, सपोनि सचिन खामगळ, पोउपनि राजेंद्र वाघ, तसेच पोलीस कर्मचारी रामप्रसाद पव्हरे, गोपाल गोशिक, प्रभाकर वाघ, प्रशांत लोखंडे, लक्ष्मीकांत आडेप, देविदास भोजने, आक्रुर धांडगे, रमेश काळे, धीरज भोसले, गणपत पवार, कविता काकस व सत्यभामा उबाळे यांनी ही कारवाई यशस्वी केली.

आरोपींविरुद्ध सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# ब्राह्मण समाजाच्या उर्वरित मागण्यांसाठी राज्यातील समन्वयकांची बदलापूर येथे बैठक

**जालना । प्रतिनिधी** - समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समिती महाराष्ट्र राज्याच्या वतीने रविवार दिनांक १४ सप्टेंबर रोजी बदलापुर येथे प्रसादम अंबरनाथ रोड बदलापुर या ठिकाणी सकाळी ११ वाजता राज्यातील समन्वकाच्या बैठकीचे आयोजन केले आहे या मध्ये सर्व राज्यातील प्रमुख समन्वयक उपस्थित राहुन चर्चा करून ब्राह्मण समाजाच्या उर्वरित मागण्या साठी आंदोलनाची पुढील दिशा ठरवली जाणार आहे शासनाने मुंबई येथील सह्याद्री अतिथी गृह येथे दिनांक ३ सप्टेंबर २०२४ रोजी परशुराम आर्थिक विकास महामंडळाची घोषणा केली व उर्वरित मागण्या लवकरच पूर्ण करू असा शब्द दिला होता परंतु आजपर्यंत त्या मागण्या शासनाने पूर्ण केल्या नाही या करिता शासनास स्मरण करून देण्यासाठी विविध विषयावर चर्चा करण्यासाठी या बैठकीचे आयोजन केले आहे.



बैठकी साठी राज्यातील समन्वयक उपस्थित राहणार आहेत अशी माहिती समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समिती चे मुख्य समन्वयक दीपक रणनवरे यांनी कळविली आहे.

बैठकी साठी धनंजय कुलकर्णी श्रीकांत जोशी अर्चना सरुडकर योगेश जांतीकर भुषण जोशी संजय देशपांडे अँड प्रज्ञा भिडे विशाल शिखरे धनंजय कुलकर्णी मधुसूदन दंडारे हे परिश्रम घेत आहेत.

# नुतन विद्यालय शाळेत शिक्षक दिन स्वयंशासनाने साजरा

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी** - जाफराबाद तालुक्यातील डोणगांव येथील दि ९ रोजी नुतन विद्यालय विद्यालयाच्या शिक्षक दिन उत्साहात करण्याकरिता यावेळी नुतन विद्यालयाचे एक दिवशी मुख्याध्यापक पदी नियुक्ती करण्यात आली कु निलोफर शेख या विद्यार्थिनी वर जबाबदारी देण्यात आली होती त्यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांना एक दिवशी शिक्षकांच्या विद्यार्थ्यांना शिकवण्याची जबाबदारी देण्यात आली विद्यार्थ्यांना विद्यार्थी शिक्षक बनले नूतन विद्यालयाचे मुख्याध्यापक पदवी दहावीची विद्यार्थिनी शाळेची मुख्याध्यापक म्हणून कु निलोफर फिरोज शेख या विद्यार्थिनी वरी जबाबदारी देण्यात आली होती तिने धुरा सांभाळली शाळेतील बऱ्याच विद्यार्थ्यांनी शिक्षक बनत विद्यार्थ्यांना अध्यापन केले यावेळी वर्ग दहावी च्या विद्यार्थ्यांतर्फे शालेय शिक्षकांचें सत्कार करण्यात आले मुख्याध्यापक परमेश्वर जगताप, समीर सय्यद शिक्षक ,सतीश खिल्लारे शिक्षक सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम यशस्वी रित्या पार पडला विद्यार्थी विद्यार्थिनी शिक्षक शिक्षिका कर्मचारी उपस्थित होते



# १५ सप्टेंबरला महिला लोकशाही दिनाचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** महिला व बाल विकास विभागाने, समस्या व पिडित महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळण्यासाठी त्यांच्या हक्कांचे संरक्षण होऊन न्याय मिळावा या हेतूने जिल्हा तसेच तालुकास्तरावर महिलांसाठी विशेष लोकशाही दिन पाळण्यात येतो. तालुकास्तरावर प्रत्येक तहसिल कार्यालयात महिन्याच्या चौथ्या सोमवारी आणि जिल्हाधिकारी कार्यालयात दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. तरी सोमवार दि. १५ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११ ते १२ वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयात महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. या महिला लोकशाही दिनात तक्रार दाखल करु इच्छिणाऱ्या महिलांनी आपली तक्रार दोन प्रतीमध्ये महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, जालना येथे दाखल करावी, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, जालना यांनी केले आहे.

अर्ज स्वीकृतीचे निकष पुढीलप्रमाणे तक्रार, निवेदन वैयक्तिक स्वरुपाचे असावे, तक्रार निवेदन दोन प्रतित सादर करावे, सदरील प्रकरण न्याय प्रविष्ठ नसावे, अर्ज विहित नमुन्यात व आवश्यक त्या कागदपत्रासह सादर करावा, सेवा व आस्थापना विषयक बाबी विचारात घेतल्या जाणार नाहीत. निवडणुक आचार संहिता काळात त्या त्या स्तरावर, विधीमंडळ अधिवेशन काळात राज्यस्तर महिला लोकशाही दिन पाळण्यात येत नाही.

महिलांनी प्रथम संबंधीत तहसिलदार यांच्याकडे महिला लोकशाही दिनाच्या पंधरा दिवस आधी दोन प्रतीत तक्रार दाखल करावी. तालुका महिला लोकशाही दिनात एका महिन्यांचे आत कार्यवाही न झाल्यास संबंधीत महिला जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनात तक्रार दाखल करु शकतील. तालुकास्तरावरील लोकशाही दिनात अर्जदार महिलेस अंतिम उत्तर शक्य तितक्या लवकर जास्तीत जास्त एक महिन्याच्या आत देण्याचे बंधन संबंधित अध्यक्ष तथा तहसिलदार व सदस्य सचिव तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी यांची राहील. महिलांनी तक्रार अर्ज दाखल करण्यासाठी तालुकास्तरावर तहसिल कार्यालय व जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्याशी संपर्क करुन या उपक्रमाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असेही जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# अमेरिकन भारतीयांनो रजा घ्या!

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष श्री डोनाल्ड ट्रम्प यांचे अमेरिकेस अधिक शक्तिशाली राष्ट्र बनविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत. कुठल्याही राष्ट्र प्रमुखाचेच नव्हे तर,त्या त्या देशातील सर्व यंत्रणा आणि सर्व सामान्य नागरिकांचे हेच ध्येय असले पाहिजे. त्यामुळे डोनाल्ड ट्रम्प यांचे अमेरिकेस अधिक शक्तिशाली राष्ट्र बनविण्याचे ध्येय असेल तर ते अजिबात वावगे नाही. अमेरिकन फर्स्ट हे त्यांचे ब्रीद जगजाहीर आहे.

पण मुळात मला प्रश्न असा पडतो की,मूळ किंवा खरा अमेरिकन कुणास म्हणावे ? कारण अमेरिकेचा इतिहास पाहिला तर असे दिसते की,

मूळ अमेरिकन लोक सुमारे १२ हजार वर्षांपूर्वी आशिया खंडातून अलास्कामार्गे उत्तर आणि दक्षिण अमेरिका खंडात स्थलांतरित झाले.अशा या खंडावर २२ ऑक्टोबर १४९२ रोजी क्रिस्टोफर कोलंबस याने पहिल्यांदा पाऊल ठेवले.पुढे तिथे स्पॅनिश, फ्रेंच,डच,इंग्रज आदी युरोपीय लोकांनी वसाहती स्थापन केल्या. या वसाहतवाद्यांनी एकत्र येऊन स्वातंत्र्य युद्ध केल्यानंतर अमेरिकेने ग्रेट ब्रिटनपासून ४ जुलै १७७६ रोजी स्वातंत्र्य मिळविले आणि हुकुमशाही, राजेशाही,लष्करशाही अशा अनेक प्रकारच्या शासन व्यवस्थांपैकी सर्वोत्कृष्ट ( परिपूर्ण नव्हे!) समजल्या जाणारी लोकशाही शासन व्यवस्था स्वीकारली.

लोकशाहीचे कट्टर पुरस्कर्ते, अमेरिकेचे १६ वे राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकन यांनी लोकशाहीची व्याख्या करताना म्हटले आहे की, लोकशाही म्हणजे लोकांचे, लोकांनी , लोकांसाठी चालविलेले राज्य होय.पण आज मात्र दुर्दैवाने लोकशाही म्हणजे लोकांकडून स्वतःला निवडून घेऊन मनमानी पद्धतीने राज्य कारभार करणे होय असे चित्र दिसतेय. अशा या अमेरिकेचे एकूण क्षेत्रफळ ९८,३३,५२० किमी इतके प्रचंड मोठे आहे. ५० राज्ये मिळून हे राष्ट्र बनलेले असल्याने त्याचे पूर्ण नाव

युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका असे आहे. कॅनडा, मेक्सिको हे अमेरिकेचे शेजारी देश आहेत.तर रशिया, कॅनडा व बहामाज् ह्या देशांच्या सागरी सीमा अमेरिकेला लागून आहेत.अमेरिका हा एक वेगळा खंड आहे,ही संकल्पना मांडणारा आणि ज्याच्यामुळे अमेरिका हे नाव पडले तो अमेरिगो वस्पुची हा संशोधक इटालियन होता.

आता इथे हे लक्षात घेतले पाहिजे की,अमेरिकन फर्स्ट असा नारा देणाऱ्या खुद्द डोनाल्ड ट्रम्प यांचे मूळही जर्मन आहे. फ्रेडरिक ट्रम्प या त्यांच्या आजोबांचा जन्म नैऋत्य जर्मनीतील कॅल्सटॅड गावात १८८५ मध्ये झाला.

त्यांचे वडील फ्रेड ट्रम्प हे न्यू यॉर्क येथे रिअल इस्टेट डेव्हलपर होते.आई मेरी अँनी मॅकलिओड ट्रम्प ही स्कॉटिश होती. डोनाल्ड ट्रम्प यांचा जन्म १४ जून १९४६ रोजी न्यू यॉर्क शहरातील क्वीन्स बरो येथे झाला.त्यांचे प्राथमिक शिक्षण खाजगी क्यू-फॉरेस्ट स्कूलमध्ये

तर माध्यमिक शिक्षण यॉर्क मिलिटरी अकादमीमध्ये झाले. पुढे ते फोर्डहॅम आणि पेनसिल्व्हेनिया विद्यापीठात शिकले.त्यांनी बॅचलर ऑफ बिझीनेस डमिनिस्ट्रेशन ची पदवी प्राप्त केली. डोनाल्ड ट्रम्प यांनी वडिलांचा व्यवसाय हाती घेतल्यानंतर या व्यवसायाचे नाव

ट्रम्प ऑर्गनायझेशन असे ठेवले.

अमेरिकेत इंग्रजी शिवाय हवाईयन, सिओक्स या भाषाही बोलल्या जातात. वॉशिंग्टन डीसी ही अमेरिकेची राजकीय तर न्यूयॉर्क ही आर्थिक राजधानी आहे. डॉलर हे अमेरिकेचे चलन आहे.प्रत्येक देशाच्या चलनाची तुलना नेहमी डॉलर शी करण्यात येते,इतके ते भारी आहे.

अमेरिकेचे नाव दिलेली व्यक्ती इटालियन होती. तर खुद्द विद्यमान अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे मूळ जर्मन आहेत,हे सर्व विस्ताराने सांगण्याचे कारण म्हणजे,अशा या एक नाही, दोन नाही , हजारो नाही तर लाखो,करोडो स्थलांतरित लोकांमुळे



हा देश घडला आहे .त्यामुळे या देशाला स्थलांतरितांचा देश असेही म्हटले जाते.

आज मितीला अमेरिकेची लोकसंख्या ३४ कोटी हून अधिक आहे.त्यात चिनी वंशाच्या लोकांची संख्या पहिल्या क्रमांकावर म्हणजे ५ कोटी ५० लाख इतकी आहे.तर भारतीय वंशाच्या लोकांची संख्या ही त्या खालोखाल म्हणजे ५ कोटी

२० लाख इतकी आहे. अमेरिकेतील आजच्या भारतीयांकडे बघून आपल्याला असे वाटते की,गेल्या ४०/५० वर्षांपूर्वीच भारतीय तिकडे जायला सुरुवात झाली असेल. तर प्रत्यक्षात तसे नाही. कारण

अमेरिकेच्या भूमीवर १६३५ साली मजूर म्हणून नेलेला आणि टॉम असे ख्रिश्चन नाव ठेवलेला हा पहिला भारतीय आहे.टॉम हा व्हर्जिनिया तील जेम्स टाऊन येथील वस्तीच्या हेडराइट मध्ये नोंदविण्यात आला होता.

अमेरिकेची वाटचाल ही कधीच साधी, सरळ, शांततापूर्ण नव्हती. अनेक वांशिक, सामाजिक, आर्थिक, मानवी हक्क विषयक लढे, आंदोलने होत होत अमेरिकेचा विकास सुरू आहे.

आता या सर्व पार्श्वभूमीवर ट्रम्प साहेबांनी भारतासह अनेक देशांवर अनेक एकतर्फी उद्योग,व्यापार, अमेरिकेत प्रवेश ,अमेरिकेत असलेल्या व्यक्तींविरुद्ध निर्बंध लावणे अशा एक ना अनेक उलटसुलट निर्णयांचा धडाका लावून सर्वांच्या काळजात धडकीच भरवली आहे.या त्यांच्या हडेलहप्पी कारभाराने अमेरिकेतील निदान अर्धी लोकसंख्या आणि जगातील सर्व देश एकीकडे तर ट्रम्प आणि त्यांचे समर्थक दुसरीकडे अशी जगाची विभागणी होणे सुरू झाले आहे. अर्थात या निमित्ताने का होईना, जगातील सर्व देश एकत्र आले,बंधुभावाने राहू लागले तर जगात सुरू असलेली युद्धे थांबतील. बहुतेक प्रत्येक देशाचा सर्वाधिक निधी हा संरक्षणासाठी खर्च होत असतो. देशादेशांमध्ये परस्पर विश्वासाचे नाते निर्माण झाले तर हा सर्व निधी त्या त्या देशातील विकास कामांसाठी

खर्च होऊन जगातील लोक शांततेने,सुखाने जगू शकतील.

पण ट्रम्प महाशयांनी अमेरिकेसह सर्व जगात जे गोंधळाचे, अशांततेचे, अस्थिरतेचे वातावरण निर्माण केले आहे,ते भविष्यासाठी नक्कीच भयसुचक आहे. जगाला घडविण्यापेक्षा बिघडविण्याचे कामच सध्या

ट्रम्प यांच्याकडून सुरू आहे.

बरे ट्रम्प यांच्या उद्देशामागे अमेरिकेचा विकास हे एकमेव कारण असते तर बाब वेगळी होती. पण या उद्देशामागे धार्मिक,वांशिक,सामाजिक कारणेही असल्याचे दिसते.

अमेरिका हे जगातील सर्वात शक्तिशाली राष्ट्र म्हणून ओळखले जाते. स्वतः अमेरिका आजपर्यंत जगात मोठा भाऊ या दादागिरीच्या भूमिकेत राहिला आहे. त्यामुळे ट्रम्प यांची आताची दादागिरी कशी रोखायची,तिला आळा कसा घालायचा, अमेरिकन काँग्रेस ला नेमके काय अधिकार आहेत,ट्रम्प साहेबांविषयी त्यांच्या पक्षात काय परिस्थिती आहे,असे एक ना अनेक प्रश्न आजच्या घडीला पडले आहेत.

या सर्व परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी, जगाला नेहमी शांततेचा संदेश देत आलेल्या भारताने आणि भारतीयांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे असे मला वाटते. यातील पहिले पाऊल म्हणून अमेरिकन भारतीयांनी सहमतीने एक दिवस ठरवून, त्या दिवसाची सामूहिक रजा घ्यावी.त्यांच्या या रजा घेण्याने अमेरिकन अर्थ व्यवस्था, दैनंदिन जीवनावर काय, किती, कसा परिणाम होतो,हे दिसून येईल.आज अमेरिकेन भारतीय एकूण कराच्या जवळपास ५ ते ६ टक्के रक्कम भरतात. अमेरिकेतील ६० टक्के हॉटेल, मोटेल व्यवसाय भारतीयांकडे आहे. अमेरिकेतील अनेक छोटे मोठे उद्योग भारतीयांनी सुरू केले आहेत. अनेक वैद्यकीय, अभियांत्रिकी ,माहिती तंत्रद्न्यान, तंत्रद्न्यान, संशोधन, शैक्षणिक प्रकल्पांमध्ये भारतीयांचे प्रमाण लक्षणीय आहे. कितीतरी उद्योग, व्यावसायिक, शैक्षणिक आणि इतर असंख्य संस्थांच्या प्रमुखपदी भारतीय वंशाच्या व्यक्ती आहेत. त्यामुळे या सर्वांनी एकत्र येऊन,सहमतीने एक दिवसाची सामूहिक रजा घेऊन आपल्या अस्तित्वाची, त्या अस्तित्वाची ,अमेरिकेच्या अस्तित्वासाठी असलेली अपरिहार्यतेची जाणीव ट्रम्प साहेबांना करून दिली पाहिजे. अमेरिकन भारतीयांचे अनुकरण इतरही लोक करतील .ट्रम्प यांच्या धोरणांशी,कार्य पद्धतीशी सहमत नसलेल्या व्यक्तीही त्यांच्या सोबत येतील आणि त्यामुळे परिस्थिती दिवसेंदिवस अधिक बिघडत जाण्यापेक्षा तिला वेळीच आळा बसण्यास मदत होईल असे मला वाटते.अर्थात यानेही फार काही फरक न पडल्यास पुढे काय करायला हवे हे पुढचे पुढे ठरविता येईल.

**देवेंद्र भुजबळ**
**९८६९४८४८००**

# पंधरा दिवसाच्या आत प्रत्येक फाईल चा निपटारा करा; सेवा पंधरवडा उत्साहाने व जबाबदारीने पार पाडा - आ. लोणीकर

## जालन्यात आमदार लोणीकर, कुचे, आदर्श सरपंच भास्कर पेरे यांच्या प्रमुख उपस्थितीत मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानातंर्गत जिल्हास्तरीय कार्यशाळा संपन्न





**जालना । प्रतिनिधी -** देशासह राज्यात देशासह राज्यात अत्यंत गतिमान आणि पारदर्शी सरकार आहे त्यामुळे सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी काम करत असताना सर्व लोकप्रतिनिधी सर्व पक्षाचे पदाधिकारी अधिकारी कर्मचारी या सर्वांनी देखील सर्वसामान्यांना न्याय देण्यासाठी अधिकाधिक काम करण्याची गरज असून पारदर्शी कारभार चालवण्याची आवश्यकता आहे त्याशिवाय गावाचा विकास होणार नाही. गावाचा विकास झाला तर राज्याचा पर्यायाने देशाचा विकास झपाट्याने होईल त्यासाठी कुठलाही काम चुकारपणा न करता प्रत्येकाने आपलं कर्तव्य प्रामाणिकपणे पार पडणे आवश्यक आहे असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी केले.

जालना येथे आज मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी आमदार बबनराव लोणीकर बोलत होते. पुढे बोलताना आमदार लोणीकर म्हणाले की, मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान हे केवळ एक उपक्रम नसून गावोगाव विकासाची नवी चळवळ आहे. गावपातळीवर सुशासन आणणे, ग्रामपंचायतींना आर्थिक स्थैर्य देणे, जलसंधारण आणि स्वच्छता याकडे गांभीर्याने लक्ष देणे तसेच ग्रामस्थांचा सक्रिय सहभाग वाढवणे हेच या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट आहे. ग्रामसभा ही लोकशाहीची खरी शाळा आहे. गावातील सर्व महत्त्वाचे निर्णय ग्रामसभेतूनच व्हायला हवेत. गावोगाव स्वच्छता, पाणी व्यवस्थापन, पर्यावरण संवर्धन आणि रोजगारनिर्मितीच्या दिशेने ठोस प्रयत्न झाले तर ग्रामविकासाची दिशा निश्चित होईल.असेही लोणीकर यावेळी म्हणाले.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की, पंचायत प्रतिनिधींनी उडठ निधी, स्वनिधी व लोकवर्गणीच्या माध्यमातून आर्थिक स्थैर्य मिळवावे. महिलांचे बचतगट, युवक मंडळे आणि स्थानिक संस्था सक्षम केल्या तर ग्रामविकासाला गती मिळेल. जनतेचा विश्वास जपला तर ग्रामपंचायती ही लोकशाहीची खरी ताकद ठरतील. गाव मजबूत झाल्यास देश मजबूत होतो, ही भावना प्रत्येकाने मनाशी बाळगावी. या अभियानाच्या माध्यमातून गावोगाव विकासाची चळवळ उभी राहणे आवश्यक आहे. प्रत्येक गावाच्या विकासासाठी गावातील ग्राम पंचायत अधिकारी व सरपंच यांच्यामध्ये समन्वय असणे देखील अत्यंत आवश्यक आहे त्यांच्या समन्वयाशिवाय गावाचा विकास होणार नाही. गावाच्या विकासासाठी सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींनी एकत्र येऊन काम करण्याची गरज असल्याचे देखील यावेळी आमदार बबनराव लोणीकर म्हणाले. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सर्वांनी जबाबदारीने पुढाकार घेण्याचा निर्धार करावा. या अभियानामुळे ग्रामपंचायतींना पारदर्शक आणि सुशासनयुक्त कारभार करण्यास चालना मिळणार असून त्यांना आर्थिक स्थैर्य प्राप्त होणार आहे. उडठ निधी, स्वनिधी व लोकवर्गणीच्या माध्यमातून गावात विकासकामांसाठी पुरेसा निधी उपलब्ध होईल. जलसंधारण, स्वच्छता आणि हरितग्राम उपक्रमांमुळे पर्यावरण संवर्धन होईल, तर मनरेगा व इतर योजनांचे अभिसरण करून रोजगारनिर्मितीची नवी दारे खुली होतील. असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

महिलांचे बचतगट, युवक मंडळे आणि स्थानिक संस्था सक्षम झाल्यास ग्रामविकासाची गती वाढेल. अंगणवाडी, शाळा आणि आरोग्यसेवा यांचा दर्जा उंचावल्यामुळे सामाजिक विकास साध्य होईल. ग्रामसभा सक्रिय होऊन लोकसहभाग वाढेल आणि प्रत्येक गावकऱ्याला विकासात थेट भूमिका घेण्याची संधी मिळेल. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान हे गावोगाव सर्वांगीण विकास घडवून आणणारे प्रभावी व्यासपीठ ठरणार असून गाव मजबूत तर देश मजबूत ही संकल्पना या अभियानाच्या माध्यमातून प्रत्यक्षात उतरणार आहे. असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

ग्रामविकासासाठी केंद्र व राज्य सरकारच्या योजना प्रभावीपणे राबविणे महत्त्वाचे असून मनरेगा व विविध शासकीय योजनांचे अभिसरण करून विकासाची गती वाढवता येईल. ग्राम पंचायतींनी उडठ निधी, लोकवर्गणी आणि स्वनिधीचा योग्य वापर करून गावातील युवक आणि महिलांचा सक्रिय सहभाग वाढविल्याशिवाय ग्राम विकासाची गती साध्य होणार नाही. महिलांचे बचतगट, युवक मंडळे व स्थानिक संस्थांच्या सामूहिक सहभागातून गावात रोजगारनिर्मिती आणि आर्थिक स्थैर्य साधण्याचा सल्ला दिला. ग्रामपंचायतींनी प्रामाणिक व पारदर्शक काम केले तरच ग्रामस्थांचा विश्वास टिकून राहतो. विश्वास जपला तरच ग्रामपंचायती लोकशाहीची खरी ताकद ठरतात असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

ग्रामविकासासाठी लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांचा प्रामाणिकपणा अत्यावश्यक असून ग्रामपंचायतींनी जनतेचा विश्वास जपण्यासाठी पारदर्शक कारभार करणे आवश्यक आहे. लोकांचा विश्वास जपल्याशिवाय ग्रामपंचायती मजबूत होऊ शकत नाहीत. त्यामुळे या अभियानाच्या माध्यमातून गावोगाव विकासाची चळवळ उभारणे ही काळाची गरज आहे. या कार्यशाळेला आमदार नारायण कुचे, जालना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, आदर्श सरपंच भास्कर पेरे पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी जालना जिल्हा परिषद उपमुख्य कार्यकारी अधिकारी बनसोडे, पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी उदयसिंग राजपूत, सरपंच परिषदेचे जिल्हाध्यक्ष शत्रुघ्न कणसे, किरण आंभूरे रमेश भापकर अशोक बरकुले यांच्यासह सर्व शासकीय विभागांचे प्रमुख, वरिष्ठ अधिकारी, पंचायत समिती पदाधिकारी, ग्राम पंचायत सदस्य, सरपंच तसेच ग्रामविकास क्षेत्राशी संबंधित मान्यवरांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

### बालविवाह आणि भ्रूणहत्या थांबवण्याची मोठी चळवळ उभारण्याची गरज - जिल्हाधिकारी मित्तल

जालना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी आपल्या भाषणात सामाजिक बांधिलकी बळकट करणे आवश्यक आहे. ग्रामपंचायती आणि गावातील सर्व घटकांनी एकत्रितपणे बालविवाहासारख्या प्रथेला आळा घालणे, स्त्री भ्रूणहत्येसारख्या समाजघातक प्रवृत्ती थांबवणे आणि महिला सक्षमीकरणाला चालना देणे ही जबाबदारी स्वीकारावी लागणार आहे. गावातील महिला बचतगट, युवक मंडळे आणि स्वयंसेवी संस्था यांच्या माध्यमातून जनजागृती घडवून आणल्यास या मोहिमा यशस्वी होऊ शकतात. गाव विकास म्हणजे केवळ रस्ते आणि इमारती नव्हे, तर सामाजिक प्रगती, सुरक्षितता आणि समानतेच्या मूल्यांचा स्वीकार हा देखील त्यात अभिन्न भाग आहे. त्यामुळे या अभियानाच्या माध्यमातून गावोगाव बालविवाह रोखण्याची आणि भ्रूणहत्या थांबवण्याची मोठी चळवळ उभी करणे आवश्यक असल्याचे जालना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यावेळी म्हणाल्या.

# शेतकऱ्यांनी नाविन्यपूर्ण पिक पद्धतीचा अवलंब करुन आर्थिक समृध्दी साधावी - जिल्हाधिकारी आशिमा मित्तल



**जालना । प्रतिनिधी -** भारत हा कृषी प्रधान देश आहे. आपली अर्थव्यवस्था ही प्रामुख्याने शेतीवर अवलंबुन आहे. तरी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी शेतीत प्रचलित पिकांऐवजी अधिक उत्पन्न देणाऱ्या पिक पद्धतीचा अवलंब करुन अधिकाधिक आर्थिक समृद्धी साधावी, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात दि. १० सप्टेंबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली कृषी विभागाच्या वतीने राज्याच्या कृषी विस्तार कार्यक्रमांना विस्तार विषयक सहाय्य (आत्मा) नियामक मंडळाच्या आढावा बैठक संपन्न झाली. याप्रसंगी त्या बोलत होत्या. बैठकीस आत्मा प्रकल्प संचालक ए. के. आगवान, जिल्हा रेशीम अधिकारी ए. पी. मोहिते, कृषी विकास अधिकारी जिल्हा परिषद जालना पी. बी. बनसावडे यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, जालना जिल्ह्याची ओळख ही बियाणांची राजधानी म्हणून सर्वत्र आहे. मात्र अजूनही शेतकरी प्रचलित पद्धतीने जी पिके घेतली जातात त्याचीच शेती करतात ज्यामुळे त्यांना उत्पन्न व मोबदला कमी मिळतो. जालना जिल्ह्यात सद्यस्थितीत रेशीम शेती मोठ्या प्रमाणावर शेतकरी करत आहेत मात्र प्रत्येक तालुक्यातील शेतकऱ्यांनी जास्त नफा देणारे रेशीम शेती, मशरूम शेती, चिया सिड्स, पांढरी मुसळी, ड्रॅगन शेती करण्याकडे भर द्यावा, असे त्या म्हणाल्या.

जिल्हा रेशीम अधिकारी, जिल्हा कृषी अधिकारी, प्रकल्प संचालक यांनी जिल्ह्यातील परतुर व बदनापूर या दोन तालुक्यांचा समावेश आकांक्षी तालुके म्हणून करण्यात आलेला या दोन्ही तालुक्यातील शेतकरी वर्गासाठी नाविन्यपूर्ण प्रस्ताव सादर करण्याबाबत निर्देश दिले. आत्मा योजनेअंतर्गत सन २०२५-२६ मध्ये राबविण्यात येणाऱ्या मुख्य बाबींमध्ये सेंद्रिय निविष्ठा निर्मिती करण्यावर भर देणे, सन २०२५-२६ मध्ये टोकन पद्धत, जोडओळ पद्धत, बीबीएफद्वारे विना अनुदानित तत्वावर सोयाबीन पिक प्रात्यक्षिके राबविणे, ड्रोन यंत्राद्वारे पिक फवारणी प्रात्यक्षिक, सेंद्रिय शेती / नैसर्गिक शेती करणाऱ्या शेतकऱ्यास बाजारपेठ उपलब्ध करून देणे, सोयाबीन बिजोत्पादनासाठी विना अनुदानित तत्वावर शेतकरी उत्पादक कंपन्यांना प्रोत्साहित करणे, चालू वर्षी नव्याने २०० शेतकरी गट स्थापन करण्याचे नियोजन त्यापैकी आज अखेर १२४ शेतकरी गट स्थापन करण्यात आले आहे. याद्वारे शेतकऱ्यांना योग्य पिक पद्धतीचा अवलंब करणेबाबत मार्गदर्शन करणे सुरू आहे, एसआरटी तंत्रज्ञान पद्धतीने कापूस लागवड करावी जेणेकरून कापूस उत्पादन वाढेल, दादा लाड तंत्रज्ञान पद्धतीने कापूस लागवड, धान्य प्रक्रिया व फळप्रक्रिया माध्यमातून शेतकऱ्यांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे, पिकांमध्ये एआय तंत्रज्ञानाच्या वापराबाबत नियोजन असल्याबाबतची माहिती आत्मा प्रकल्प संचालक ए. के. आगवान यांनी दिली.

# परतूर पोलिसांकडून वाहतूक नियमनासाठी विशेष मोहीम; ७७,५०० रुपयांचा दंड वसूल

**परतूर । प्रतिनिधी -** परतूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत बुधवारी, १० सप्टेंबर २०२५ रोजी वाहतुकीचे नियमन करण्यासाठी एक विशेष मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेत शहराच्या विविध भागांमध्ये नाकाबंदी करण्यात आली, ज्यामुळे वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात आली.

या मोहिमेदरम्यान, पोलिसांनी परतूर शहर आणि परिसरातील एकूण ७६ वाहनांची तपासणी केली. तपासणी केलेल्या वाहनांपैकी, २० दुचाकींवर नियमांचे उल्लंघन झाल्याचे आढळले. यामध्ये प्रामुख्याने 'ट्रिपल सीट' प्रवास, फॅन्सी नंबर प्लेटचा वापर आणि इतर वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांचा समावेश होता. या सर्व वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईचा एक महत्त्वाचा भाग म्हणून, पोलिसांनी १६ दुचाकी वाहनांवर अल्पवयीन मुले वाहन चालवताना आढळली. यामुळे, पोलिसांनी त्यांच्या पालकांना पोलीस ठाण्यात बोलावून घेतले. त्यांना समज देऊन नोटीस बजावण्यात आली आणि वाहनांवर दंडात्मक कार्यवाही करण्यात आली.



या विशेष मोहिमेत एकूण ७७,५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. पोलीस प्रशासनाने यापुढेही परतूर शहर आणि परिसरात अशा प्रकारच्या मोहिमा वेळोवेळी राबवणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

सदरची मोहीम यशस्वी करण्यासाठी पोलीस अधीक्षक, अजय कुमार बंसल, अपर पोलीस अधीक्षक, आयुष नेपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी, आर. टी. रेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली परतूर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सुदाम भागवत, रावते, पोउपनि. दीपक आढे आणि बालाजी पितळे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

या कारवाईमुळे वाहतुकीच्या नियमांचे पालन करण्याचे महत्त्व अधोरेखित झाले असून, शहरात शिस्तबद्ध वाहतूक व्यवस्था निर्माण होण्यास मदत होईल अशी अपेक्षा आहे.

# जालना-वडिगोद्री महामार्ग खड्डेमय अवस्थेमुळे अपघातांचे प्रमाण वाढले

**धाकलगाव । प्रतिनिधी -** जालना ते वडिगोद्री या राज्य महामार्गाची अत्यंत दुरवस्था झाली असून, रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने वाहनचालकांसाठी हा मार्ग धोकादायक बनला आहे. यामुळे, दररोज लहान-मोठे अपघात घडत असून विशेषतः दुचाकीस्वारांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या समस्येमुळे स्थानिकांमध्ये प्रशासनाबद्दल तीव्र नाराजी पसरली आहे.

**खड्डे, फांद्या आणि मातीचा धोका**

या महामार्गावर ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत, ज्यामुळे वाहनचालकांना गाडी चालवणे अवघड झाले आहे. खड्ड्यात गाडी गेल्यानंतर घसरून पडण्याचे प्रमाण वाढले आहे. यासोबतच, अवंड ते वडिगोद्री या अंतरावरील रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडांच्या फांद्या थेट महामार्गावर आल्या आहेत, ज्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. पावसाळ्यात रस्त्यावर साचलेली माती वाहनांना ब्रेक लावताना अडथळा निर्माण करते, ज्यामुळे दुचाकी घसरण्याचा धोका वाढतो.

**दुभाजकांची दयनीय अवस्था**

या महामार्गावरील दुभाजकांची अवस्था अत्यंत खराब आहे. अनेक ठिकाणी दुभाजकांमधील लाईटचे खांब पडलेले आहेत आणि दुभाजक गवत व कचऱ्याने भरलेले आहेत. धाकलगाव येथील दुभाजक फुटलेल्या अवस्थेत असल्याने वाहनांना योग्य दिशा मिळत नाही, ज्यामुळे अपघाताचा धोका आणखी वाढतो. या दुभाजकांमध्ये झाडे लावून ती स्वच्छ करावीत, अशी मागणी ग्रामस्थ करत आहेत.





**प्रशासनाकडून दुर्लक्ष**

या गंभीर समस्येबद्दल ग्रामस्थांनी आणि स्थानिक प्रशासनाने अनेक वेळा महामार्ग मंत्रालय आणि स्थानिक प्रशासनाकडे तक्रारी केल्या आहेत. मात्र, अद्यापही या तक्रारींची कोणतीही दखल घेण्यात आलेली नाही. धाकलगाव ग्रामपंचायतीचे सदस्य रोहित बनसोडे यांनी सांगितले की, रस्त्यावर खड्डे इतके वाढले आहेत की रोज अपघात होतात. आम्ही प्रशासनाकडे अनेक वेळा तक्रार केली आहे, पण कोणीही लक्ष देत नाही. वाढत्या अपघातांची संख्या लक्षात घेता, स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे तातडीने रस्ता दुरुस्त करण्याची आणि महामार्गाची स्वच्छता करण्याची मागणी केली आहे. जर याकडे लवकर लक्ष दिले नाही, तर भविष्यात आणखी गंभीर अपघात होण्याची शक्यता आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.